नकदी जमाबंदी सरकारी आकार होईल त्यास कार होईल त्यास हक्क दर सद्दे रुपये २ दोन प्रमाणें रयत निसबत करार केला असे. देत जाणें.

कलम १.

गल्ला हर जिन्नस सरकारी जमाबंदी होईल त्यास हक्क दर खंडीस कैली बारुलें मापें ८।। अदमण रयत निसबत करार केला असे. देत जाणें.

कलम १

मानपान ठीक विडा व शिरपाव देशमुखाचे मागे घ्यावा ऐसें करार केलें असें. त्याप्रमाणें घेत जातील.

कलम १

पाा मजकुरीं लग्नें व मुहूर्त होतील त्यास शेला जीवनमवाफीक द्यावयाचा करार असे. देत जाणें.

कलम १

पाा मजकुरीं जे गांवीं ह्मार असतील ते गावचा ह्मार सालीना आठ दिवस राबणुकेस द्यावयाचा करार करून दिल्हा असे. ह्मारानें त्याप्रमाणें राबणूक करावी.

कलम १

पाा मजकुरीं तेली ज्या गावीं असतील त्यास दर घाणियास सालीना पेंड वजन पंधरपैशी ८।। अदमण करार करून दिल्हा असे. तेलियांनीं द्यावी.

कलम १

पाा मजकुरी लग्नें होतील व मुहूर्त होतील त्यास चिठ्ठी देश-कुळकर्णी मजकूर लेहून देतील. तेरीख महालचे फडणीस घालतील. मोर्तब महालकरी सरकारचे करतील. याप्रमाणें करार केला असे. त्याप्रमाणें चिठ्ठी घेत जाणें.

कलम १

किरकोळ बाब देशमुखाचे निमे देशकुळकर्णी मजकूर यास द्यावयाचा करार करून दिल्हा असे. देशमूख घेतील त्याचे निमेप्राो देत जाणें.

कलम १

सेव सबजी व वानंगी देशमुखाचे निमे करार केली असे. देत जाणें.

कलम १

तेली पाा माारीं ज्या गांवीं असतील त्यास दर घाणियास दरमहा तेल वजन पंधर पैसे ६६ १ एक शेर करार करून दिल्हे असे. तेलियापासून घेतील. देत जाणें.

कलम १

प्राा मजकुरीं जे गांवीं सुतार असतील त्याणीं सालीना एक नांगर भरून द्यावा.

कलम १

प।। मजकुरीं ज्या गांवीं कुंभार असेल त्यास दर गांवास सालीना मडकियाची वरड १ एक करार केली असे. कुंभारांनीं द्यावी.

कलम १

प।। मजकुरीं मोचेकरी यांचीं दुकानें ज्या गांवीं असतील त्या गावास सालीना मोचे जोडा १ एक करार करून दिल्हा असे. मोचेकरी देतील.

कलम १

प।। मजकुरीं तांबोळी जे गांवीं असतील त्यास दर दुकानीं दररोज पानें पानवेलीचीं सुमार १३ तेरा करार करून दिल्ही असते. तांबोळीयानीं द्यावीं.

कलम १

कुलकर्णी मजकूर याचें खासगत वर एक व चाकरांचीं घरें पांच व बटकींची घरें जीं असतील तीं पाल दिल्हीं असत.
कलम १

कसबें माहीम येथें सरकारचीं घरें आहेत त्यांपैकीं एक घर देखील आगवाडा व पीसवाडा वतनी घरवाडा दिल्हा असे.
कलम १

कुळकर्णी मजकूर यांचा गाडा खासगत एक रानांत जाऊन शिवार व लाकूडफाटें आणील. त्यास जकात माफ केली असे.
कलम १

कुळकर्णी मजकूर यांचें खासगत गलबत बारपंधरा खंडींचें माहिमाहून वसईप्रांतें गल्ला जिन्नस लांकूडफाटें शिवार आणतील त्यांस जकायत माफ केली असे.
कलम १

प।। मजकुरीं सरकारांत झाप घ्यावयाचा शिरस्ता आहे. त्यास दर सद्दे सरकार बेरजेस सालीना झाप १ रयत नि।। हक्क करार करून दिल्हा असे. देत जाणें.
कलम १

वतनसंबंधें इनामगांव मौजे दहीवालें प।। मजकूर हा गांव कुलबाब कुलकानू दरोबस्त इनाम दिल्हा असे.
कलम १

इनाम अगरवाडिया २ दोन एकूण आकार रुपये.

३५ कसबे माहीम भाट पाखाडी
४० मौजे केळवें भाट पाखाडी

---

७५

एकूण आगर दोन राजभाग सरकारी आकार पाऊणाशे रुपये करार करून सरकारांतून इनाम दिल्या असेत. मशारनिले अनभवितील.
कलम १

कुलकर्णी मजकूर याचें खासगत घरचे बेगमीस बटीक १ एक व घोडें १ एक व बैल एक व टोणगा १ एक व ह्मैस १ सालीना विकत घेतील. तरी त्यास सरकार तर्फेची जकात व शिंगशिंगोटी माफ केली असे.
कलम १